14 JUN 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन बैठकीत विविध विषयांना मान्यता

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठातील पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन सल्लागार समितीची दुसरी बैठक बुधवारी झाली. चालू शैक्षणिक वर्षापासून पत्रकारिता ऑनलाईन पदविका कोर्स, राष्ट्रीय परिषदेसह पत्रकारांसाठी कार्यशाळेच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. यासह डॉ. ग. गो. जाधव यांच्या पत्रकारितेवरील ग्रंथ, अल्पचरित्र, डॉक्युमेंटरी आणि व्याख्यानमालेतील मान्यवरांच्या भाषणांच्या संपादित पुस्तकांचे नियोजन आणि सत्यशोधक पत्रकारितेच्या शिल्पकारांची संशोधनात्मक पुस्तक प्रकाशित करण्याच्या प्रस्तावांनाही सदस्यांनी बैठकीत मान्यता दिली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

बैठकीत अध्यासनाचे सदस्य व दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचे नूतन अध्यक्ष व दैनिक 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद हॉलमध्ये बैठक झाली.

- पत्रकारीता ऑनलाईन पदविका कोर्स
- राष्ट्रीय परिषदेसह कार्यशाळांचे नियोजन
- डॉ. ग. गो. जाधव ग्रंथ प्रकाशन
- सत्यशोधक पत्रकारिता शिल्पकार पुस्तक

बैठकीच्या सुरुवातीस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी मागील बैठकीचा आढावा घेतला. पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचे चेअर प्रोफेसर डॉ. रत्नाकर पंडित यांनी कार्यवृत्तांत वाचला. यावेळी प्रत्येक प्रस्तावावर सदस्यांनी चर्चा केली. यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून पत्रकारितेचा ऑनलाईन पदविका कोर्सला मान्यता देण्यात आली. तसेच पुढील वर्षापासून एम.ए. डिजिटल कम्युनिकेशन हा अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या सल्लागार समितीच्या बैठकीत बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदींसह डावीकडून सहा. प्रा. डॉ. शिवाजी जाधव, डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. विजय धारुलकर, डॉ. सुधीर गव्हाणे, व्ही. टी. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. रमेश जाधव, डॉ. निशा मुडे-पवार आदी. (छाया : पप्पू अत्तार)

पुणे येथील एमआयटीचे अधिष्ठाता डॉ. सुधीर गव्हाणे, ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ डॉ. विजय धारुलकर या सदस्यांनी अभ्यासक्रमाबाबत बैठकीत सविस्तर मुद्दे मांडले. पत्रकारितेसंदर्भातले देशातील हे पहिले अध्यासन असल्याचा मुद्दा मांडत सदस्यांनी व्यापक राष्ट्रीय परिषद आणि पत्रकारांसाठी कार्यशाळा आयोजित करण्याच्या विषयाला मान्यता दिली. डॉ. ग. गो. जाधव यांच्या पत्रकारितेवरील सहा. प्रा. डॉ. शिवाजी जाधव यांच्या पीएच.डी. प्रबंधाचा ग्रंथ प्रकाशित करण्यासह त्यांचे अल्पचरित्र, डॉक्युमेंटरी तयार करण्यास सदस्यांनी मान्यता दिली. डॉ. ग. गो. जाधव व्याख्यानमाला १९८८ पासून सुरू आहे. या व्याख्यानमालेतील मान्यवरांच्या मार्गदर्शनाचे संपादित पुस्तक तयार करण्याचे नियोजनही करण्यात आले. महाराष्ट्राला सत्यशोधकी विचारांची परंपरा आहे. या परंपरेला लोकाभिमुख बनवण्यासाठी दैनिक 'पुढारी'ची भूमिका महत्त्वाची असल्याचा मुद्दा डॉ. गव्हाणे यांनी मांडला. त्यामुळे सत्यशोधकी पत्रकारितेच्या शिल्पकारांचे पुस्तक अध्यासनाच्या वतीने प्रकाशित करण्यात यावे, या आयत्यावेळी मांडण्यात आलेल्या विषयाला बैठकीत मंजुरी देण्यात आली. ऑनलाईन पत्रकारिता कोर्सचा प्रारंभ लवकरच करण्याविषयी सदस्यांनी चर्चा केली.

बैठकीत दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत व शैक्षणिक कार्यक्रमांबाबत सूचना केल्या. या सूचनांना सदस्यांनी मान्यता दिली. अध्यासनाच्या वतीने संशोधनाचे प्रकल्प राबवण्याचे नियोजन करण्याविषयी कुलगुरू डॉ. शिंदे यांनी मांडलेल्या भूमिकेवर सविस्तर चर्चा झाली. अध्यासनाची सर्वसोयीनियुक्त आणि स्वतंत्र इमारतीबाबत चर्चा झाली.

या चर्चेत ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. रमेश जाधव, वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार आदींनी सहभाग घेतला. अध्यासनाची वेबसाईट तसेच माहिती पुस्तिका तयार करण्याच्या सूचनांवर चर्चा झाली. यावेळी विद्यापीठाच्या पॅनेलवरील आर्किटेक्ट जीवन बोडके यांनी नियोजित इमारत आराखड्याचे सादरीकरण केले. यावेळी विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सहा. प्रा. डॉ. शिवाजी जाधव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUN 2018
महाराष्ट्र टाईम्स

# बृहत् आराखड्यासाठी विद्यापीठाचे मोबाइल ॲप

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

विद्यापीठ परिक्षेत्रातील विविध परिसरांची भौगोलिक, सामाजिक तसेच आर्थिक निकड जाणून घेऊन संबंधित ठिकाणच्या आवश्यकतेनुसार त्या-त्या ठिकाणी नवे विषय, अभ्यासक्रम, महाविद्यालय, मान्यताप्राप्त संस्था, संशोधन केंद्र, सॅटेलाइट केंद्र यांच्यासाठी बृहत आराखड्यात तरतूद करण्यात येणार आहे, याबाबत सर्वसामान्य नागरिकांना सूचना देता याव्यात यासाठी मोबाइल ॲप कार्यान्वित केले आहे. राज्यातील सर्व विद्यापीठांपैकी केवळ शिवाजी विद्यापीठातर्फे हा अभिनव प्रयोग राबविण्यात आला आहे.

विद्यापीठांतर्गत संलग्न कॉलेजच्या परिसरातील शैक्षणिक गरज, विद्यार्थ्यांची संख्या, भौगोलिक महत्त्वानुसार नव्या अभ्यासक्रमांची गरज याबाबत माहिती संकलित करण्यासाठी विद्यापीठाच्या वतीने सर्वेक्षण करण्याची मोहीम सुरू आहे. हे सर्वेक्षण करण्यासाठी विद्यापीठाद्वारे SUKPP 19 या नावाचे मोबाइल ॲप विकसित केले असून, ते गुगल प्ले स्टोअरवर मोफत उपलब्ध आहे. तसेच विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील मुख्य पृष्ठावर बृहतआराखडा : शास्त्रीय सर्वेक्षणाच्या प्रश्नावली या नावाने वेब लिंक उपलब्ध केली आहे. मोबाइल ॲप आणि वेब लिंकवर सर्व १२ घटकांसाठी स्वतंत्रपणे विविध घटकनिहाय प्रश्नावली उपलब्ध केल्या आहेत. तसेच यामधील प्रत्येक प्रश्नासाठी बहुपर्यायी उत्तरेसुद्धा उपलब्ध आहेत. सर्वेक्षण प्रक्रिया २० जूनअखेर मोबाइल ॲपवर उपलब्ध आहे.

> **संबंधित ॲप आणि वेब लिंक सर्वसामान्य लोकांना हाताळणे अत्यंत सोपे आहे. मोबाइल ॲप अथवा विद्यापीठ संकेतस्थळावरील वेब लिंकद्वारे लागू असणाऱ्या प्रश्नावलीमध्ये योग्य माहिती भरून या सर्वेक्षणामध्ये यशस्वी सहभाग नोंदविल्यास बृहत आराखड्यातील नोंदींचे काम मार्मिकपणे होऊन नेमक्या तरतुदी करता येतील.**
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के,**
> प्र कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUN 2018
पुढारी

# बृहत आराखड्यासाठी तयार केले मोबाईल ॲप

## शिवाजी विद्यापीठाचा उपक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या कालावधीचा पंचवार्षिक बृहत आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. विद्यापीठ परिक्षेत्रातील विविध परिसरांची भौगोलिक, सामाजिक तसेच आर्थिक निकड जाणून घेऊन शास्त्रोक्त सर्वेक्षणाचा कार्यक्रम विद्यापीठाने सुरू केला आहे.

हे सर्वेक्षण करण्यासाठी विद्यापीठाच्या वतीने 'एसयुके पीपी १९' या नावाचे मोबाईल ॲप विकसित केले असून, हे ॲप गुगल प्ले स्टोअरवर मोफत उपलब्ध आहे. तसेच विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर 'बृहत आराखडा : शास्त्रीय सर्वेक्षणाच्या प्रश्नावली' या नावाने वेब लिंक उपलब्ध आहे. मोबाईल ॲप आणि वेबलिंकवर सर्व बारा घटकांसाठी स्वतंत्रपणे विविध घटकनिहाय प्रश्नावल्या उपलब्ध आहेत. तसेच यामधील प्रत्येक प्रश्नाकरिता बहुपर्यायी उत्तरेदेखील उपलब्ध आहेत. हे ॲप आणि वेब लिंक सर्वसामान्य लोकांना हाताळणे सोपे आहे. सर्वेक्षण प्रक्रिया ही दि.१३ ते २० जून २०१८ या कालावधीमध्ये मोबाईल ॲप व वेब लिंकवर उपलब्ध आहे. मोबाईल ॲप किंवा विद्यापीठ संकेतस्थळावरील वेबलिंकद्वारे लागू असणाऱ्या प्रश्नावलीमध्ये योग्य ती माहिती भरून या सर्वेक्षणामध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन विद्यापीठामार्फत करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUN 2018
तरुण भारत

# विद्यापीठ बृहत आराखडा आता मोबाईल ॲपद्वारे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०१९–२० ते २०२३–२४ या कालावधीचा पंचवार्षिक बृहत आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. विद्यापीठ परिक्षेत्राचे भौगोलिक सर्वेक्षण करून बृहत आराखडा तयार करण्यासाठी विद्यापीठाद्वारे 'SUK PP 19' या नावाचे ॲप विकसित केले आहे. हे ॲप गुगल प्ले स्टोअरवर मोफत उपलब्ध आहे, अशी माहिती विद्यापीठातर्फे देण्यात आली आहे.

शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील विविध परिसरांची भौगोलिक, सामाजिक तसेच आर्थिक निकड जाणून, संबंधित ठिकाणाच्या आवश्यकतेनुसार तेथे नविन विषय, अभ्यासक्रम, महाविद्यालय, मान्यताप्राप्त संस्था, संशोधन केंद्र, सॅटेलाईट केंद्राची उभारणी करण्यात येणार आहे. यासाठी बृहत आराखड्यामध्ये तरतूद करणे जरुरीचे आहे. याकरिता सर्वेक्षण कार्यक्रम विद्यापीठाने सुरू केला आहे.

**शिवाजी विद्यापीठाने तयार केले 'SUK PP 19' मोबाईल ॲप**

यासाठी विद्यापीठाद्वारे 'SUK PP 19' या नावाचे ॲप विकसित केले आहे. तसेच विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील मुख्य पृष्ठावर 'बृहत आराखडा : शास्त्रीय सर्वेक्षणाच्या प्रश्नावली' या नावाने वेब लिंक उपलब्ध केली आहे. येथे घटकनिहाय प्रश्नावली उपलब्ध केल्या आहेत. येथे सर्वेक्षण प्रक्रिया ही २० जून पर्यंत उपलब्ध आहे. प्रश्नावलीत माहिती भरून या सर्वेक्षणामध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

14 JUN 2018 महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांच्या समाधानावर मूल्यांकन

Appasaheb.mali
@timesgroup.com
Tweet : Appasaheb_MT

**कोल्हापूर :** उच्च शिक्षणाची गुणवत्ता, संशोधनाची तपासणी करतानाच कॉलेज आणि विद्यापीठ पातळीवरील शिक्षण पद्धती आणि सुविधांवर विद्यार्थी समाधानी आहेत का? याचाही धांडोळा आता घेतला जाणार आहे. यासाठी 'नॅक'ने (नॅशनल असेसमेंट अँड अॅक्रिडिटेशन कौन्सिल) मूल्यांकनाच्या स्वरूपात बदल केले आहेत. 'नॅक'मार्फत मूल्यांकन प्रक्रियेच्या प्रारंभीच संबंधित कॉलेज आणि विद्यापीठ आवारातील ५० टक्के विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण होणार आहे. शैक्षणिक संस्थांसाठी दिलासादायक बाब म्हणजे, 'नॅक'च्या मूल्यांकन पिअर कमिटीतील सदस्य संख्येवर मर्यादा घातली आहे. कमिटी केवळ तीन सदस्यीय असून त्यांनी अवघ्या दोन दिवसांत तपासणी करावयाची आहे.

यापूर्वी मूल्यांकनासाठी सदस्यांचे जम्बो पथक, शहरातील मोठ्या हॉटेलमध्ये निवासाच्या सोयीपासून ते पाहुणचार हा सार्वत्रिक चर्चेचा विषय ठरला होता. उच्चशिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता आणि व्यवस्थेचे मूल्यमापन पारदर्शीपणे झाले पाहिजे, जागतिक दर्जाच्या पातळीवर उच्चशिक्षणाची व्यवस्था पोहोचावी यासाठी सरकारच्या पातळीवर विविध प्रयत्न सुरू आहेत. त्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून उच्चशिक्षण क्षेत्रातील कॉलेज आणि विद्यापीठाचे मूल्यांकन करणाऱ्या 'नॅक' मूल्यांकन स्वरूपातही बदल केले आहेत. जम्बो पथकाद्वारे होणारे मूल्यांकन नव्या स्वरूपात असणार नाही. नव्या स्वरूपात पिअर कमिटीचा प्रवास खर्च, निवास व्यवस्थेची जबाबदारी शैक्षणिक संस्थेवर असणार नाही. 'नॅक'मार्फतच त्यांची व्यवस्था केली जाणार आहे.

'नॅक' मूल्यांकनाच्या नव्या स्वरूपात विद्यार्थ्यांवर अधिक फोकस आहे. नॅक मूल्यांकनासाठी प्रस्ताव सादर करताना कॉलेज आणि विद्यापीठातील सर्वंकष शैक्षणिक माहिती सादर करावयाची आहे. सोबतीला शैक्षणिक संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांची मेल आयडी, मोबाइल नंबर कळवायचे आहेत. 'नॅक'कडून एकूण पटसंख्येपैकी ५० टक्के विद्यार्थ्यांचे ज्या त्या शैक्षणिक संस्थेतील पायाभूत सुविधा, विद्यार्थीकेंद्रित उपक्रमासंबंधी ऑनलाइन सर्वेक्षण होईल. प्रत्येक विद्यार्थ्याला नॅकची लिंक पाठवून त्या माध्यमातून माहिती संकलित होणार आहे. दहा टक्के विद्यार्थ्यांनी माहिती भरणे बंधनकारक आहे.



## ५० टक्के विद्यार्थ्यांचा होणार 'नॅक'कडून सर्व्हे

## ...तर थेट स्वायत्तचा दर्जा

यापूर्वी नॅक समितीच्या भेटीप्रसंगी सादरीकरणावर भर होता. आता त्या कागदपत्रांची प्रमाणपत्रे स्कॅन करून ऑनलाइन सादर करावी लागतील. विद्यार्थ्यांचे समाधान सर्वेक्षण, ७० टक्के ऑनलाइन माहिती सादरीकरणानंतर मूल्यांकनासाठी पात्र ठरलेल्या कॉलेज आणि विद्यापीठांना १००० गुणांची प्रश्नावली भरावी लागणार आहे. अंतिम चार गुणांपैकी ३.५१ गुण प्राप्त करणाऱ्या कॉलेजना यूजीसीकडून थेट स्वायत्त शैक्षणिक संस्थेचा दर्जा दिला जाणार आहे.

## विद्यापीठाची तयारी सुरू

शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने 'नॅक'च्या चौथ्या टप्प्यातील मूल्यांकनासाठी तयारी सुरू केली आहे. मूल्यांकनाच्या अनुषंगाने कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली वेगवेगळ्या कमिट्या स्थापन केल्या आहेत. अधिविभागप्रमुखांच्या बैठका घेऊन जबाबदारी निश्चित केली. साधारणपणे नोव्हेंबर २०१९ मध्ये नॅक मूल्यांकन समितीकडून विद्यापीठाचे मूल्यांकन होऊ शकेल, या दृष्टीने विद्यापीठ प्रशासन नियोजन करत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUN 2018
तरुण भारत

# परदेशी विद्यार्थी प्रवेश नियमावलीस मान्यता

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामधील विविध विभागांमध्ये व विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या विविध महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रमांसाठी परदेशी विद्यार्थ्यांसाठीच्या नियमावलीस मंगळवारी शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. बैठकीस प्र कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, सदस्य सचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर उपस्थित होते.

बैठकीमध्ये एम. बी. ए. युनिटमध्ये यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून ३ नवीन अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आली. यामध्ये पी. जी. डिप्लोमा इन ई बिजनेस, दूर शिक्षण केंद्राअंतर्गत बी. ए. होम सायन्स, एम. ए. सायकॉलोजी व एम. पी. एड या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. नॅशनल इम्प्लॉयबिलीटी ऑफ इनहान्समेंट मिशन रेग्युलेशन २०१७ अंतर्गत विद्यापीठामध्ये भरावयाच्या पदांना मान्यता देण्यात आली.

14 JUN 2018 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापू

# विद्यापीठ अधिविभागांची प्रवेश प्रक्रिया जाहीर

## १८ जून ते ४ जुलैपर्यंत प्रक्रिया सुरू राहणार : वेळापत्रक लिंकद्वारे जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठांतर्गत एम. ए., एम. कॉम., एल. एल. एम., एम. एस्सी. टेक., गणित आदी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे. ही प्रक्रिया १८ जून ते ४ जुलैपर्यंत सुरू राहणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली आहे.

शिवाजी विद्यापीठांतर्गत अधिविभागांच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी यापूर्वी ऑनलाईन प्रवेश अर्ज मागवण्यात आले होते. एम. सी. ए. (सायन्स) भाग १ या अभ्यासक्रमासाठी मंगळवारी ऑनलाईन प्रवेशपूर्व परीक्षा घेण्यात आली होती. विद्यापीठांतर्गत अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया वेळापत्रक www.unishivaji.ac.in"Admissin2018" या लींकवर जाहीर केले आहे. अधिक माहितीसाठी प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

### ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया



–१८ जून रोजी तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिद्ध.
–२१ रोजी तात्पुरत्या गुणवत्ता यादीतील तक्रारी नोंद.
–२२ रोजी अंतिम गुणवत्ता यादी.
–२६ रोजी पहिल्या फेरीसाठीच्या जागा प्रसिद्ध होणार.
–२७ रोजी पहिल्या फेरीतील प्रत्यक्ष प्रवेश निश्चिती.
– २९ रोजी पहिल्या फेरीसातील रिक्त जागा जाहीर
–३० दुसऱ्या फेरीतील प्रत्यक्ष प्रवेश निश्चिती.
–३ जुलै रोजी दुसऱ्या फेरीतील रिक्त जागा व इतर विद्यापीठ कोट्यातील जागांची यादी प्रसिद्ध.
– ४ जुलै रोजी रिक्त जागा व इतर विद्यापीठातील विद्यार्थ्यांना स्पॉट ॲडमीशन.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUN 2018
Times of India

# MA in psychology at SUK from this year

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) will offer MA Psychology course on its campus from the current academic year.

A decision in this regard was taken at the management council meeting on June 12 at the university. SUK pro-VC D T Shirke said that it was a long-pending demand to have a separate psychology department and the same has been acknowledged with this decision.

According to Shirke, for the first year they have identified a temporary infrastructure for the course and in due time it will get its separate infrastructure.

"It is just the beginning of the course. Hence, we won't be rushing. The fee for the same will remain affordable and a circular regarding the overall admission process for the same will be issued soon," he said, adding that the varsity is planning to offer around 20 seats in the first batch.

14 JUN 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. नंदकुमार मोरे यांचा शिवसेनेतर्फे सत्कार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
मराठी चंदगडी बोलीमध्ये संशोधन केल्याबद्दल शिवाजी विद्यापीठातील मराठीचे प्राध्यापक डॉ. नंदकुमार मोरे यांचा शिवसेनेतर्फे सत्कार करण्यात आला. शिवसेना जिल्हाप्रमुख संजय पवार आणि विजय देवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

जागतिक कीर्तीचे भाषातज्ज्ञ डॉ. गणेश देवी यांनी संशोधन आणि संपादित केलेल्या भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण या पुस्तकात मराठी भाषेला चौथे स्थान मिळाले आहे. हे पुस्तक जगभरातील भाषा अभ्यासकांना उपलब्ध झाले आहे. या कामासाठी शिवाजी विद्यापीठातील प्रा. नंदकुमार मोरे यांनी या पुस्तकासाठी संशोधनात्मक माहिती संकलित केली आहे. बडोदा येथील भाषा संस्थेतर्फे प्रकाशित बृहत् सर्वेक्षण प्रकल्पात चंदगडी बोलीचा मराठीतील महत्त्वाची प्रादेशिक भाषा म्हणून समावेश करण्यात आला आहे. त्याबद्दल शिवसेनेतर्फे शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या-हस्ते मोरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर आदी उपस्थित होते.

